दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १६ वे ● अंक ३५० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.१६ मार्च २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## पनवेल महापालिकेचे पर्यावरणपूरक होळी करण्याचे आवाहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी पर्यावरण पूरक होळी करावी असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी आवाहन केले आहे. होळीत होणारी साधनसंपत्तीची हानी व त्यातून होणारे पर्यावरणाचे साधनसंपत्तीची हानी व त्यातून होणारे पर्यावरणाचे साधनसंपत्तीची हानी व त्यातून होणारे पर्यावरणाचे नुकसान टाळण्यासाठी नागरिकांनी पर्यावरणपूरक होळी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



पर्यावरणाचे नुकसान टाळण्यासाठी छोटी होळी करा, तसेच होळीत प्रथा म्हणून पोळी टाकण्या ऐवजी त्या पोळीचे गरजूंना दान केले जावे. तसेच नागरिकांनी होळी साठी वृक्ष तोड करू नये, धुलिवंदन दिवशी नैसर्गिक रंगाचा वापर करून आरोग्याची काळजी घ्यावी, पाण्याची काटकसर करावी असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# सिडकोतर्फे आता एकूण ६,५०८ सदनिका विक्रीकरिता उपलब्ध

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

**होळी सणाचे औचित्य साधत सामान्य नागरिकांच्या आयुष्यात रंग भरण्यासाठी सिडकोतर्फ ५७३० सदनिकांच्या महागृहनिर्माण योजना २०२२ अंतर्गत नवी मुंबईतील विविध नोडमधील अतिरिक्त सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. आता या योजनेच्या माध्यमातून एकूण ६,५०८ सदनिका विक्रीकरिता उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे जास्तीत जास्त नागरिकांना योजनेचा लाभ घेऊन नवी मुंबईमध्ये आपले हक्काचे घर घेण्याचे स्वप्न पूर्ण करणे शक्य होणार आहे.**

सिडको महामंडळातर्फे २६ जानेवारी २०२२ रोजी ५,७३० घरांच्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला होता. या योजनेंतर्गत नवी मुंबईतील वेगाने विकसित होणाऱ्या तळोजा नोडमध्ये ५,७३० सदनिका आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि सर्वसाधारण प्रवर्गातील नागरिकांकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. या सदनिकांव्यतिरिक्त नवी मुंबईच्या द्रोणागिरी, घणसोली, कळंबोली, खारघर आणि तळोजा नोडमधील काही अतिरिक्त सदनिका सदर योजनेंतर्गत उपलब्ध करून देण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. यामुळे सदर योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता द्रोणागिरी येथे १८१, घणसोली येथे १२, कळंबोली येथे ४८, खारघर येथे १२९ आणि तळोजा येथे १५३५, अशा एकूण १९०५ सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सर्वसाधारण



प्रवर्गाकरिता द्रोणागिरी येथील २४१, कळंबोली येथील २२, खारघर येथील ८८ आणि तळोजा येथील ४२५२, अशा एकूण ४,६०३ सदनिका उपलब्ध आहेत. याप्रमाणे, एकूण ६,५०८ सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

योजनेतील अर्ज नोंदणी ते सोडत या दरम्यानच्या सर्व प्रक्रिया या ऑनलाइन पद्धतीने पार पडणार असून याकरिता www.lottery.cidcoindia.com हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

या संकेतस्थळावर अर्जदारांना अर्ज नोंदणी, कागदपत्रे सादर करणे आणि अनामत रकमेचा भरणा करावयाचा आहे. तथापि, अर्जदारांना ठिकाण (नोड) निवडण्याचा पर्याय उपलब्ध असणार नाही. संगणकीय सोडत काढून वरीलपैकी कोणत्याही ठिकाणची सदनिका अर्जदारांना सिडकोकडून वाटपित करण्यात येईल.

पहिली सोडत पार पडल्यानंतर अ.जा./अ.ज./भ.ज./वि.ज. या वैधानिक आरक्षित प्रवर्गातील सदनिका शिल्लक राहिल्यास त्वरित दुसरी सोडत काढण्यात येऊन या सदनिकांचे वाटप वैधानिक प्रवर्गांतील उर्वरित पात्र अर्जदारांना करण्यात येईल. तर पत्रकार, दिव्यांग, माजी सैनिक, राज्य शासन कर्मचारी, नवी मुंबई प्रकल्पबाधित, माथाडी कामगार, धार्मिक अल्पसंख्य या प्रवर्गांकरिता आरक्षित सदनिका पहिल्या सोडतीनंतर शिल्लक राहिल्यास, दुसरी सोडत काढण्यात येऊन या सदनिकांचे वाटप या प्रवर्गांतील तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील उर्वरित पात्र अर्जदारांना करण्यात येईल.

गृहनिर्माण योजनेतील अन्य अटी व शर्ती कायम असून योजनेशी संबंधित सर्व प्रक्रिया या पूर्वनियोजित वेळापत्रकाप्रमाणेच पार पडतील, असे सिडकोकडून कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे या अतिरिक्त सदनिकांचा जास्तीत जास्त नागरीकांनी लाभ घ्यावा असे सिडकोतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

## बालाजी सिम्फोनी सोसायटीमध्ये लागलेल्या आगीत एक महिला ठार ; एक जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील सुकापूर येथे असलेल्या उत्तुंग अशा बालाजी सिंम्पोनी सोसायटीमधील २८ व्या मजल्यावरील एका ब्लॉकला आज दुपारच्या सुमारास लागलेल्या आगीत एक महिला आगीत होरपळून मृत्यू पावली आहे. तर एक महिला जखमी झाली असून तिला एमजीएम रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आल्याची माहिती मिळत आहे.



आज दुपारच्या सुमारास बालाजी सिंम्पोनी येथील २८०५ या ब्लॉकमध्ये अचाकनपणे आग लागून या आगीत एक महिला होरपळून मृत्यू पावल्याचे समजते. तर एक महिला जखमी झाली आहे. या घटनेची माहिती मिळताच खांदेश्वर पोलिसांचे पथक व अग्नीशमन दलाचे पथक घटनास्थळी रवाना होवून आगीवर नियंत्रण मिळविले आहे. सदर महिला या कोणत्या कारणामुळे या आगीत होरपळल्या तसेच हा घातपाताचा तर प्रकार नाही ना? याबाबत अधिक तपास खांदेश्वर पोलीस करीत आहेत. दरम्यान सोसायटीला लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये दोघेजण त्याच मजल्यावरुन गडबडीने बाहेर पडताना दिसत आहेत. त्याचप्रमाणे येथे असलेले सुरक्षा रक्षक व इतर नागरिकांनी दिलेल्या माहितीच्या आधारे या घटनेचा उलगडा करण्याचे आव्हान खांदेश्वर पोलिसांसमोर आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. सदर दोन महिलांची अधिक माहिती घेण्याचे काम खांदेश्वर पोलीस करीत आहेत.

## मागण्यांची अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत उपोषण सोडणार नाही पत्रकार विराज टिळक यांचा निर्धार

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगर पंचायत प्रशासन विरोधात विविध मागण्यांसाठी तळा तालुक्यातील पत्रकार विराज टिळक हे आमरण उपोषणाला बसले आहेत. आज पासून तळा नगरपंचायत प्रशासकीय कार्यालयासमोर त्यांच्या उपोषणाला सुरूवात झाली आहे. आज त्यांच्या उपोषणाचा पहिला दिवस आहे. दरम्यान, पत्रकार टिळक यांना पाठिंबा देण्यासाठी तळा शहर त्याचप्रमाणे तळा तालुक्यातून मोठ्या संख्येने प्रतीष्ठीत नागरिक, राजकीय पदाधिकारी ग्रामस्थ यांनी पत्रकार विराज टिळक यांच्या आमरण उपोषणास पाठिंबा दिला.मागण्यांची अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण सोडणार नाही, असा निर्धार टिळक यांनी केला केला आहे.



२५ फेब्रुवारीला टिळक यांनी एका निवेदनद्वारे तळा नगरपंचायत मुख्याधिकारी यांना तळा शहरात असलेल्या सस्येबाबत आमरण उपोषण करणार असल्याची माहिती दिली होती.परंतु सुस्त असलेल्या या प्रशासनाने या आमरण उपोषणाची कुठलीही दखल घेतली नाही येणाऱ्या तीन दिवसात उष्णतेची लाट येणार आहे या उष्णतेच्या लाटेमध्ये उपोषणकरत्याचे काही बरे वाईट झाल्यास यास तळा नगरपंचायत प्रशासन जबाबदार राहील अशी चर्चा सध्या बाजारपेठेत रंगली होती.टिळक जरी उपोषणाला बसणार असले तरी संपूर्ण तळ्यातून त्यांना मोठा पाठिंबा मिळत आहे. कालच्या दिवसभरात मोठ्या संख्येने तळा शहरवासी विराज टिळक यांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांना पाठिंबा जाहीर करत आहेत तसेच विविध संघटनांनी देखील टिळक यांना पाठिंबा दर्शवला आहे. त्यांच्या या उपोषणाला अनेक संघटनांसह नेत्यांचा देखील पाठिंबा मिळत आहे. पत्रकारांची संघटना असणारी रायगड प्रेस क्लब यांची देखील यात भर पडली आहे त्यांनी टिळक यांना प्रत्यक्ष जागेवर येऊन पाठिंबा दर्शविला आहे.भाजपा सरचिटणीस

.../२

## संक्षिप्त...

### एकनाथ खडसेंकडून फडणवीसांवर आरोपांची सरबत्ती

**जळगाव । वृत्तसंस्था**

'देवेंद्र फडणवीस यांना एक नोटीस आली आणि त्यांचा जळफळाट सुरू झाला आहे. देवेंद्रजी म्हणतात मी भ्रष्टाचार बाहेर काढला म्हणून माझी पिळवणूक सुरू झाली. भाजपमध्ये असताना तुम्ही नाथाभाऊंची पिळवणूक केली नाही का?' असा सवाल करत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते एकनाथ खडसे यांनी भाजप नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे.

माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सायबर पोलिसांनी चौकशीसाठी समन्स पाठवल्याने त्यांनी महाविकास आघाडी सरकारवर ताशेरे ओढले आहेत. यावरून एकनाथ खडसे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली. मुक्ताईनगर तालुक्यातील पुरनाड येथे आयोजित कार्यक्रमात खडसे बोलत होते. यावेळी त्यांनी आपल्या भाषणातून देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकास्त्र सोडले. 'मी मुख्यमंत्रिपदाचा दावेदार होतो हे तुम्हाला माहीत होताच तुम्ही माझी पिळवणूक सुरू केली. माझ्यामागे जमीन भूखंड प्रकरण, अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम याच्या बायकोसोबत संबंध जोडले, अंजली दमानिया यांना माझ्यामागे लावलं, हे उद्योग कोणी केले?' अशा शब्दांत खडसे यांनी देवेंद्र फडणवीस यांना फटकारलं आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना फोन टॅप झाल्याचा गंभीर आरोप एकनाथ खडसे यांनी केला आहे. 'फोन कोणाचे टॅप होतात ज्यांचे अंडरवर्ल्डशी संबंध आहेत त्यांचेच फोन टॅप होतात. माझे काय देशद्रोह्यांसोबत संबंध आहेत का? मग माझा फोन टॅप करण्याचं कारण काय?' असा सवाल करत एकनाथ खडसे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे.

## ठाणा नाका येथील नागरिकांसाठी लवकरच सुरू होणार ओपन जिम

### विभागातील पाण्याच्या टाकीच्या कामाची प्रितम म्हात्रे यांनी केली पाहणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ठाणा नाका येथील पायोनियर विभागात भूखंड क्रमांक ११४ या ठिकाणी स्थानिक नगरसेवक आणि विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या नगरसेवक निधीमधून नागरिकांच्या मागणीनुसार ओपन जिम चे काम सुरू झाले होते त्या कामाची पाहणी करण्यासाठी प्रितम म्हात्रे यांच्यासोबत नगरसेविका डॉक्टर सौ सुरेखा मोहोकर नगरसेविका सौ प्रीती जॉर्ज उपस्थित होत्या. यावेळी पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी कटेकर, कर्डीले(बांधकाम विभाग ) विलास चव्हाण, तायडे (पाणी पुरवठा) यांच्याशी सुरू असलेल्या कामाबद्दल त्यांनी चर्चा केली.

यावेळी प्रितम म्हात्रे यांनी ओपन जिम संदर्भात सुरू असलेल्या कामामध्ये काही सूचना केल्या जेणेकरून भविष्यात त्या प्लॉटवर होणाऱ्या गार्डन आणि इतर विकासाच्या वेळी ओपन जिम चा अडथळा होणार नाही. त्या प्लॉटवर प्रभागातील अभिनव युवक मित्र मंडळाच्या माध्यमातून गणेशोत्सव मोठ्या भक्तीभावाने आणि जल्लोषाने साजरा करण्यात

.../२

> सदर पाण्याची टाकी पाठपुरावा करून आम्ही लवकरच सुरू करून घेऊ, जेणेकरून या टाकीच्या माध्यमातून मिळणाऱ्या पाण्यामुळे ठाणा नाका, लोखंडी पाडा, अशोक बाग परिसरातील पाण्याचा प्रश्न निकाली निघेल.
>
> **: प्रितम जनार्दन म्हात्रे ,विरोधी पक्ष नेते, पनवेल महानगरपालिका**



## शिवसेनेमुळे दहावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेनेमुळे आज दहावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे

शहरातील अमरधाम स्मशानभूमी ते ओल्ड पोस्ट ऑफिस या पूर्ण भागात शट डाऊन /भारनियमन करण्यासंबंधीचे मेसेज नागरिकांना काल रात्री उशिरा प्राप्त झाले होते. आजपासून दहावीची परीक्षा सुरू होत असून पहिला पेपर आहे व परीक्षेचे सेंटर देखील या पट्ट्यात मोडते, तथापि विद्यार्थ्यांचा सुरू असलेला अभ्यास, प्रचंड उकाडा या सर्वांमुळे आजच्या दिवशी हे भारनियमन होऊ नये अश्या तक्रारी शिवसेना महानगर संघटक, मा. नगरसेवक ड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांच्या कडे काही नागरिकांनी व्हाट्सअप वर द्वारे केल्या होत्या. सदर बाबतीत सकाळी ताबडतोब महावितरणकडे याबाबत सोमण यांनी चर्चा केली असता महानगरपालिकेच्या एका कामामुळे लाईन बंद करणार आहोत असे सांगितले. त्यावेळी महानगरपालिकेचे उच्चपदस्थ अधिकारी व महावितरणचे अधिकारी यांच्याशी वारंवार संपर्क आणि पाठपुरावा घेऊन आज सकाळी नऊ वाजल्यापासून होणारे भारनियमन त्यांनी रद्द करण्यास भाग पाडले. चुकीच्या वेळी अशा पद्धतीने काम सुरू करून विद्यार्थी व नागरिकांना त्रास झाल्यास प्रत्यक्ष जागेवर येऊनच काम बंद करू असा इशारा सोमण यांनी दिला. अखेरीस महापालिका व महावितरणच्या अधिकाऱ्यांनी सहकार्य करत आजचे भारनियमन करणार नसल्याबाबतची खात्री शिवसेनेला दिल्याने पालक वर्गाने आभार मानले आहेत.

# खाकी वर्दीतले एक डॅशींग नेतृत्व शिवराज पाटील

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**

**पनवेल** : पोलीस म्हटले की रूबाब, कडक शिस्त, डॅशींग नेतृत्व नुसते पोलीस यंत्रणेचे एखादे वाहन जरी नागरीकांच्या गर्दीत येऊन थबकले तरी का बरे ? काय झाले ?असे अनेक प्रश्न सर्वसामान्यांच्या डोक्यात विचारचक्राची पाल चुकचुकली जाते. परंतु याच खाकी वर्दीत एक आपल्या सारखाच माणुस आहे व ती व्यक्ती सर्व सामान्य व गोरगरीबांच्या रक्षणासाठी आहे. कायदा व सुव्यवस्थेचे कटाक्षाने पालन करून नागरीक भयमुक्त कसा राहील या करीताच आपलाच माणुस आहे हे त्या क्षणी कदाचीत विसरायला होते. नवीमुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत पोलीस सेवेत अनेक वरीष्ठ अधीकारी आले अत्यंत चांगली सेवा त्यांनी जनतेला देऊन आपला कार्यकाळ संपल्यानंतर सेवानिवृत्तही झाले. त्यात अजीत पारसनिस, विजय कांबळे, रामराव घाडगे, प्रभात रंजन, शहाजी सोळंकी, वसंत वाघ, वालचंद मुंडे, अशोक गायकवाड अन्य अनेकांनी आपला कार्यकाळ गुन्हेगारांवर वचक ठेवून व सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम चोख बजाविले. तर पोलीस उपायुक्त अंकुश शिंदे हे झोन २ मध्ये असताना त्यांनी देखील आपला ठसा येथे चांगलाच उमटविला होता.



अशाच एका खाकी वर्दीतील डॅशींग पोलीस अधिकारी शिवराज पाटील यांनी नवीमुंबई आयुक्तालय क्षेत्रातील झोन दोनच्या पोलीस उपायुक्त पदाचा पदभार स्वीकारताच क्राईम कंट्रोलची चुणुक दाखवायला सुरुवात केली. गुन्हेगारांचे कर्दनकाळ, खाकी वर्दीचा दमदार वचक तर सर्व सामान्य नागरीकांत आपुलकीची भावना थोड्याच दिवसात दाखवायला शिवराज पाटील यांनी सुरुवात केली.

आपल्या कार्यक्षेत्रातील सुमारे १० पोलीस ठाण्याच्या वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांना त्यांनी सक्त सुचना वजा आदेशाचे फर्मानच काढले. पोलीस ठाण्याच्या हद्दीत क्राईम कंट्रोल झालाच पाहीजे. तसेच सामान्य गोरगरीबांना नाहक त्रास देऊन दहशतीची जरब बसविणारी मंडळी यांना टार्गेट करत दिनांक १-१०-२०२० ते फेब्रुवारी २०२२ या कालावधीत सुमारे १६ जणांना हद्दपारीचा जोरदार दणका पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी दिला.

**खुन, खुनाचा प्रयत्न आदी गंभीर गुन्हे उघकीस....तर अनेक आरोपी अटक...**

शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली १० पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चॅलेन्जींग खुनातील २९ गुन्हे उघडकीस आणण्यात विविध पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक व त्यांच्या सक्षम टिमने उत्कृष्ट कामगीरी करून या खुन प्रकरणातील सुमारे आजमितीला ४६ आरोपी अटक करण्यात पोलीसांना यश आले. तसेच खुनाचा प्रयत्न करणारे सुमारे ११ गुन्हे विविध पोलीस ठाण्यातील उघड झाले आहेत त्यात सुमारे ३४ आरोपींना अटक करण्यात आली.

**दरोडा, जबरी चोरी, फसवणुक, आदी गुन्हाची केली उकल...कोटीच्या घरात माल हस्तगत....**

दरोडा, जबरी चोरी, घरफोड्या वाहन चोरी व फसवणूक, ठकबाजी असे सुमारे १० पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेले गुन्हे शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ५७७ गुन्हाचा छडा लावण्यात पोलीस यशस्वी झाले तर या विविध गुन्हयात थोडे थोडके नव्हे तर ८५२ आरोपी अटक करण्यात पोलीसांना चांगले यश आले.

वरील विविध गुन्हयात सुमारे १४,१७,५०,४८१ इतका माल हस्तगत करण्यात झोन टु चे दणकेबाज सक्षम अधिकारी शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनामुळे व १० पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या सुक्ष्म नेटवर्किंगच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या जनसंपर्क असल्यानेच ते शक्य झाले. या बाबत शिवराज पाटील यांनी सरतेशेवटी या यशाचे खरे मानकरी नवीमुंबई पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंग असल्याचे त्यांच्या बोलण्यातून अखेर स्पष्ट झाले.

# एटीएम कार्ड एक्सजेंज करून फसवणूक करणाऱ्या ८ जणांच्या टोळीस घातक शस्त्रासह अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एटीएम कार्ड एक्सजेंज करून फसवणूक करणाऱ्या बिहार राज्यातील ८ जणांच्या टोळीस घातक शस्त्रासह व ८९ एटीएम कार्डसह अटक करून ६ गुहे उघडकीस आणले आहेत . एटीएम सेन्टर मध्ये पैसे काढण्यास गेलेल्या ग्राहकाला विचलीत करून पैसे काढण्यास मदत करण्याच्या बहाण्याने त्याचा पीन नंबर जाणून घेऊन , हातचलाकीने एटीएम कार्ड ची आदलाबद्दल करून स्वतःजवळील ब्लॉक झालेले त्याच बँकेचे कार्ड त्या ग्राहकास देऊन त्याचे चालू कार्ड स्वतःकडे घेऊन , त्याद्वारे पैसे काढून सर्व सामान्य लोकांची फसवणूक होत असलेल्या अनेक तक्रारी विविध पोलिस ठाणे येथे प्राप्त होत होत्या.त्या बाबत पोलीस गुन्हे बिपीनकुमार सिंह ,सह.पोलीस गुन्हे डॉ जय जाधव ,अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे महेश घुर्ये ,पोलीस उप आयुक्त गुन्हे सुरेश मेंगडे सहा पोलीस आयुक्त गुन्हे विनायक वस्त यांनी सदरचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत आदेश गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलचे वरिष्ट पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांना करताच त्यांची टीम मागील काही दिवसापासून फसवणूक झालेल्या लोकाकडून फसवणूक कश्या प्रकारे झाली याची माहिती घेऊन संबंधित ए.टी.एम. सेंटर मधील फुटेज,डम डेटा याचा अभ्यास करत असताना हे सर्व गुन्हे करणारी ऐक बिहार राज्यातील टोळी असल्याची खात्री झाली. ही टोळी बिहार राज्यातून काही कलावधी साठी मुंबईत येऊन गुन्हे करून पुन्हा निघून जात असल्याचे आढळून आले.

त्या बाबत सातत्य राखत त्यांच्या वरती निगराणी ठेवली असता नमूद ची टोळी अश्या प्रकारे फसवणूक करत असतानाच मोठ्या प्रमाणात रक्कम लुट करून पसार होण्यासाठी पनवेल शहर येथील काही ए.टी.एम. सेंटर वरती दरोडा टाकण्यासाठी येणार असल्याची खबर पो.उप.नि.मानसिंग पाटील यांना प्राप्त झाली. त्यानुसार स.पो.नि. प्रवीण फडतरे,संदीप गायकवाड व पथक यांनी सदर ची टोळी ही कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी समोरील परिसरात दरोड्याची तयारी करीत असताना घातक शस्त्रासह मिळून आल्याने त्यांचा विरुद्ध पनवेल शहर पो.ठाणे गुन्हा रजी.क्र.१६४/२१ कलम ३९९,४०२ भा.द.वी.सह ४,२५ भा.ह.का. सह ३७,१३५ मा.पो.का.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.त्या नुसार नमूद ८ लोकांकडे घातक शस्त्रासह वेगवेगळ्या बँकेचे ऐकून ८९ ए.टी.एम कार्डस मिळून आले आहेत यात अटक आरोपींची नावे बच्चा महावीर माहतो वय ४३,मुनीलालकुमार कृष्णा माहतो वय २५,नवीन हेदर पासवान वय २४, नरेश कुमार रामबाबू सहानी वय ३१,सुनील बोन्धा सहानी वय २६ ,भदाई हिरामण सहानी वय २८,आ-वदेश लालजी पासवान वय २८,मोहम्मद रिझवान मोहम्मद नन्न वय ३२ सर्वजण राहणार समराबनोतीय ता.तिरकोलिया जि. मोतिहार .बिहार राज्य . अटक आरोपीनी अद्याप पर्यत ६ गुन्ह्यांची कबुली दिली आहे त्यात रबाळे पो.ठाणे , पनवेल शहर पो.ठाणे आदी चा समावेश आहे .आरोपी कडून हस्तगत केलेले ८९ ए.टी.एम.कार्ड्स हे ही फसवणूक केलेल्या लोकांचेच असल्याने संबंधित बँके कडून माहिती प्राप्त करीत आहोत .आरोपींकडून आणखीन बरेच गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे .

# मार्च संपत आला; जॅकवेल कडे जाणारा रस्ताच होत नाही

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

खंडित पाणी पूरवठा सुरळीत करण्या साठी व पंप नियोजनासाठी साप, विंचु, काट्याची भिती, दिवाबत्ती गैरसोयीच्या उतेखोल येथिल जॅकवेल पंप हाऊस कडे जाणाऱ्या निर्मनुष्य कच्च्या रस्त्यावरुन रात्री अपरात्री पाणी कर्मचाऱ्यांना पंप सुरु करण्यासाठी दिवसातून अनेक वेळेसे असुरक्षित स्थितीत ये-जा करावी लागते. जेमतेम १०० मिटरचा तुकडा (कच्चा रस्ता) नगर पंचायत कडुन अनेक वर्ष दुर्लक्षित, तो का करीत नाही असे प्रश्नचिन्ह असुन याला जबाबदार कोण? असा सवाल ऐरणीवर आला आहे.



हा रस्ता धोकादायक स्थितीत असुन येथे पक्का रस्ता होणे काळाची गरज आहे. नगर पंचायत प्रशासनाने विशेष तरतुद करुन हा जवळ पास शंभर सवाशे मिटरचा जॅकवेल कडे जाणारा रस्ता करणे गरजेचे आहे. इतकी वर्ष होऊनही ही किरकोळ पण अत्यंत महत्वाची बाब का दुर्लक्षित होत आहे? या ठिकाणी नगरपंचायत प्रशासनाने तातडीने लक्ष वेधावे अशी पाणी पुरवठा कर्मचाऱ्यांसह नागरिकांची देखिल मागणी आहे.

अनेकदा यांत्रीक बिघाड, खंडीत विज पूरवठा कमी जास्त दाबाने चालणारी महावितरणची विज आणि नैसर्गिक आपत्ती, गडगडाट वीज पाऊसाचा खेळ या सर्व गोष्टींचा परिपाक, परिणामी पिण्याच्या पाण्याचा पूरवठा खंडित, यामुळे येथिल पाणी पूरवठा कर्मचाऱ्यांची या ठिकाणी ये-जा करताना तारांबळ व त्रेधा तिरपीट उडते. प्रचंड वाढलेल्या लोकवसाहतींमुळे या यंत्रणांचे नियोजन, देखभाल, दुरुस्ती अत्यंत महत्वाची ठरते.

# नागरिकांच्या गोंधळा नंतर सोडली स्पेशल लोकल ट्रेन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्थानकात एक्सप्रेस उशिरा पोचल्याने रेल्वे स्थानकात प्रवाशांनी गोंधळ घातल्याची घटना रविवारी घडल्याचे समोर आली आहे. उशीर झाल्याने घरी जाण्यासाठी लोकल मिळणार नसल्याने प्रवाशांनी गोंधळ घातल्याचे सांगितले जात आहे. या गोंधळा नंतर प्रवाशांसाठी रेल्वे प्रशासनाने उशिरा स्पेशल ट्रेन सोडून प्रवाशांना घरी सोडण्याची व्यवस्था केली.

रविवारी पुणे करमाळा या एक्स्प्रेस ला पनवेल स्थानकात येण्यास उशीर झाला नेहमी ८ च्या आसपास पोचणारी रेल्वे पनवेल रेल्वे स्थानकात उशिरा १२ वाजून २० मिजीटने पोचल्यामुळे, पनवेल रेल्वे स्थानकातून शेवटची पनवेल ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल्स लोकल ट्रेन निघून गेली होती , शेवटची लोकल देखील निघून गेल्या मुळे, उशिरा एक्स्प्रेस ने आलेल्या प्रवाश्यांनी मोठी गैरसोय झाली होती. त्यांना पहाटे पर्यत ट्रेन साठी थांबावे लागेल असे कळल्यावर या प्रवाश्यांनी विशेष लोकल सोडावी यासाठी रेल्वे स्टेशन प्रबंधक च्या कार्यालयावर घेराव घातला, यावेळी स्टेशन प्रबंधकानी ट्रेन सोडणार नाही पहाटे सोडणार असं सांगितल्यावर प्रवाश्यांनी गोधळ घालण्यास सुरवात केली यामुळे रेल्वे पोलीस आणि एस.आर.पी.एफ च्या जवानांना पाचारण करण्यात आले यावेळी पोलिसांनी मद्यस्थि करत काहीतरी मार्ग काढतो सांगत प्रवाशांना शांत केले. अखेर रेल्वे प्रश्नासांनी एक वाजता पनवेल ते छत्रपती शिवाजी टर्मिनल्स अशी विशेष लोकल प्रवेशासाठी सोडली या वेळी तब्बल ३०० प्रवाशांनी लोकल मधून प्रवास केल्याचे सांगितले जात आहे. रेल्वे प्रशासनाच्या निर्णया नंतर ट्रेन ने सर्व प्रवाशी आपल्या घरी पोहचले.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे : वलप, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत श्री.सुभाष श्रीधर महाजन रा.मु.वलप, ता.पनवेल, जि.रायगड यांचेकडून आमचे अशिल मे.रोशन इंटरप्रायझेस तर्फे श्री.रोशन कृष्णा पाटील रा.गावदेवी समोर मौजे : वलप, पडघे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांनी बांधकाम (विकसन) करण्यासाठी ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे : वलप, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| वलप | ४६ | ८ ब | ०-४६-४ पैकी ०-२२-० गुंठे करिता |

तरी वरील मिळकती बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा-कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील आणि वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.१५/०३/२०२२

**सही/-**
**ॲड.दिनानाथ के. सोनकर**
**गाळा नं.१६, कल्पवृक्ष को.ऑप.हौ.सो.,**
**प्लॉट क्र.४, सेक्टर ९, खांदा कॉलनी**
**नवीन पनवेल (पश्चिम), पि.नं.४१०२०६**



मुजावर साहेब कोर्ट

ॲड.सुजाता पाटील ८८७९४१६४८३

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.३०४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०४/२०२२

श्रीमती.वैशाली विजय खैरनार इतर तीन — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अ.नं.२ व ३ व ४ यांचे वडील कै. श्री.विजय वसंतराव खैरनार हे दि.०५/०४/२०२१ रोजी बी.ए.आर.सी. हॉस्पिटल, खारघर नवी मुंबई येथे मयत झाले. मयत कै.श्री.विजय वसंतराव खैरनार यांचे नांवे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मालमत्ता परिशिष्ट**

**अ) (५० टक्के भाग)**
**सदनिका नं.ए-१०४, बालाजी आंगण,**
**सेक्टर ३, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, महाराष्ट्र**
**एकूण क्षेत्रफळ : ७२३ व ६७.२ चौ.फूट**

**ब) (५० टक्के भाग)**
**सदनिका नं.१०४, प्रिमायसेस रेसिडेन्सी, प्लॉट नं.७१,**
**सेक्टर ११, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**एकूण क्षेत्रफळ : ५४.०६ चौ.मी.**

**क) (५० टक्के भाग)**
**सदनिका नं.जी-२६, सत्यज्योत, अदाई व्हिलेज,**
**पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**
**क्षेत्रफळ : ४१० व २३० (पार्कींग) चौ.फुट**

**ड) (१०० टक्के भाग)**
**सदनिका नं.२१० एच नं.६३१ व ३२**
**बुधवार पेठ, पुणे ४११००२**
**क्षेत्रफळ : २३४ चौ.फुट**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत मे.न्यायालयात अर्ज केलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१५/०३/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# उल्हास नदी निर्मल जल ४०+ चषक स्पर्धा संपन्न

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुका ४०+ क्रिकेट संघटने तर्फे उल्हास नदी निर्मल जल ४०+ चषक स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते, या स्पर्धेस सर्व स्तरामधील उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कर्जत ४०+ नेहमीच एखादी सामाजिक संकल्पना आधारीत आपल्या ४०+ क्रिकेटच्या स्पर्धा आयोजीत करीत आलेले आहेत, प्रथम पर्वा मधे या संघटने तर्फे कर्जत मधील ७० ते ९० च्या दशकातील सर्व सिनियर क्रिकेटपटूंचा सत्कार करण्यात आला, दुसरे पर्वात यांनी आपल्यातीलच एक सहकारी गमावला त्याची कुठेतरी जबाबदारी म्हणून त्याच्या कन्येस तिच्या पुढील आयुष्याकरीता काही आर्थिक मदत मुदत ठेव (ऋऊ) स्वरुपात दिली, या वर्षी यांनी उल्हास नदी जी कर्जतची जिवनदायीनी आहे, तिच्या संवर्धन व साफसफाई मोहिमे करीता आर्थिक हातभार लावण्याकरीता योगदान देण्याचे ठरविले आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते करण्यात आले, याप्रसंगी कर्जतचे तहसीलदार विक्रम देशमुख,कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे, उद्योजक संतोष भोईर, माजी नगराध्यक्ष राजेश लाड, नगरसेवक संकेत भासे, मनसेचे प्रविण गांगल, रणजीत जैन, मधुकर सुर्वे, महेंद्र निगुडकर, रायगड भुषण दिपक राणे, कर्जत क्रिकेट भुषण बाळा धनवे आदीसह प्रशासकीय आणी राजकीय व्यक्ती उपस्थित होत्या.या उद्घाटन प्रसंगी त्यांनी प्रशासकीय अधिकारी वर्ग व राजकीय व्यक्ती यांच्यात प्रदर्शनीय सामना खेळवीण्यात आला. या स्पर्धेत धाकटी पंढरी पंचक्रोशी ४०+ या संघाने प्रथम पारितोषिक व नेताजी पालकर चौक ४०+ संघाने द्वितीय पारितोषिक पटकावले. कर्जत ४०+ संघटनेचा मुळ उद्देश हा एक धाव आरोग्यासाठी तसेच यांच ब्रीदवाक्य पुन्हा एकदा तरुण्याकडे हे आहे. आपली कर्जत तालुका ४०+ क्रिकेट संघटना ही या पुढेही ज्येष्टांचे मार्गदर्शन व सहकारी सदस्यांच्या मदतीने नेहमीच एकसंघ राहुन आरोग्य, खेळ, पर्यावरण व सामाजिक विषयक बांधिलकी जपुन कार्यरत राहील असे प्रतिपादन संघटनेचे तालुका अध्यक्ष शशांक शेट्टी, संस्थापक अध्यक्ष गजेन्द्र दांडेकर व कार्याध्यक्ष दिनेश कडू यांनी सांगितले.


मा.मुजावर साहेब

ॲड.शेखर खोपकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.३६०/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०५/२०२२

१) श्रीमती.गंगाबाई कैलास केणी
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.अविष्कार कैलास केणी
वय : १६ वर्षे, धंदा : शिक्षण
३) कु.श्रेया कैलास केणी
वय : १४ वर्षे, धंदा : शिक्षण
क्र.२ व ३ करिता अपाक आई
क्र.१ श्रीमती.गंगाबाई कैलास केणी
४) श्रीमती.धर्मुबाई धाया केणी
वय : ८१ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.रुम नं.३०१, साईदिप, प्लॉट नं.२६,
आर-२, करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे पती, अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील व अर्जदार क्र.४ यांचा मुलगा मयत कैलास धाया केणी हे दि.२२/०३/२०२१ रोजी मयत झाले आहेत. मृत्यूसमयी मयत कैलास धाया केणी यांच्या नावे मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :-

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| यु.के.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|---|
| वडघर-५५ | १३३ | ४ | ०-४०-० |
| वडघर-५५ | ९२ | २ ब | ०-१०-७ |
| | ९६ | १ | ०-५२-२ |
| | १३१ | ३ | ०-३५-३ |
| | ३ | ३ | ०-९८-२ |
| वडघर-१२५ | १३७ | ३ ब | ०-४४-२ |

अर्जदार यांनी सदरील चौकशी अर्ज मयत कैलास धाया केणी यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी अर्जदार यांचे क्लेम संबंधात जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला प्रदान करण्यात येईल हे सर्व कळावे.

ही नोटीस आज दि.१५/३/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



**NEELKANTH VISHWA PHASE-1 CO-OP. HSG SOC. LTD.**
REGD.No. RGD/PWL/HSG/(TC)/3853/2018-19/2018, Dated 04/07/2018
Survey No.139 & 140, Usarli-Khurd, Tal-Panvel, Dist-Raigad, Pin-410221

## वार्षिक सर्वसाधारण सभा अधिसूचना

निलकंठ विश्व फेज-१ को.ऑप.हौसिंग सोसायटीची तिसरी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २७/०३/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता सोसायटीच्या आवारात सामाजिक अंतर ठेवून खाली दिलेल्या विषयावर चर्चा व संमती देण्यासाठी घेण्यात येणार आहे.

### विषयपत्रिका

१) दिनांक २८/०३/२०२१ रोजी झालेल्या दुसऱ्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचणे आणि मंजूर करणे.
२) एप्रिल २०२१ पासून आजपर्यंतच्या कालावधीत व्यवस्थापकीय समितीचा अहवाल / उपलब्धी वाचणे आणि मंजूर करणे
३) लेखा परिक्षण सुधारणा अहवाल आणि त्यावरील समितीने केलेल्या कार्यवाहीसह ताळेबंद आणि उत्पन्न आणि खर्च विवरणे यांचा समावेश असलेल्या खात्यांचे लेक्षापरिक्षित विवरण मंजूर करणे आणि स्वीकारणे.
४) पहिली सर्वसाधारण सभा मधील पूर्वीच्या मंजूर ठरावांमध्ये सुधारण / जोडणे मंजूर करणे आणि २०२१-२२ / २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी सोसायटीचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी आणि सोसायटीच्या सुरळीत प्रशासनासाठी आणि त्याच्या सोयी-सुविधांसाठी आर्थिक तरतूद करण्यासाठी प्रस्तावित बजेट.
५) राज्य सरकारने मंजूर केलेल्या पॅनेलमधून सोसायटी खात्यांचे वैधानिक लेखापरिक्षण करण्यासाठी आर्थिक वर्ष २०२१-२०२२ साठी बाह्य वैधानिक लेखापरिक्षक नियुक्त करणे
६) पुर्वसुचनेची आवश्यकता नसताना, अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

**टीप :-**

१) सदस्यांना विनंती करण्यात आली आहे की, त्यांच्या शंका असल्यास, लिखीत स्वरुपात किंवा सोसायटीच्या ईमेलवर (neelkanthvishwap1@gmail.com) नवीनतम १५ मार्च २०२२ पर्यंत प्रस्तुत करणे, ज्यामुळे त्यांच्या प्रश्नांच्या स्पष्टीकरणासाठी माहिती गोळा करणे सुलभ होईल.
२) केवळ सदस्यांना आणि त्यांच्या अनुपस्थितीत सह-सदस्यांना सभेला उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाईल. कोणत्याही प्रतिनिधी उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही.
३) मागणी केल्यावर देण्यासाठी सदस्यांनी त्यांचे लसीकरण प्रमाणपत्र सोबत ठेवावे.
४) सरकारी प्राधिकरणांनी जारी केलेल्या COVID मार्गदर्शक तत्वांनुसार AGM आयोजित केली जाईल. सर्व सभासदांना त्याचे पालन करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

**सही/-**
**निलकंठ विश्व फेज-१ को.ऑप.हौसिंग सोसायटी लिमिटेड**
**सचिव**



## पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जि.रायगड**

**कार्यालय : आयुक्त मुख्यालय, २ रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल-४१०२०६, दूरध्वनी क्रमांक : ०२२-२७४५८०४०/४१/४२**

जा.क्र.पमपा/पर्यावरण/३९२२/प्र.क्र.१/२५ — दिनांक : १५/०३/२०२२

### जाहीर नोटीस

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात माझी वसुंधरा अभियानाचे अंमलबजावणीसाठी त्रयस्थ संस्थेची सल्लागार म्हणून नेमणूक करणेकामी तातडीने इच्छुक पुरवठाधारक/व्यक्ती यांचेकडून जाहीर निविदा मागवित आहोत.

संबंधितांनी त्यांची सिलबंद निविदा महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागात दिनांक २५/०३/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावीत. सदर तारखेनंतर आलेली जाहीर निविदा विचारात घेतली जाणार नाहीत.

| अ.क्र. | कामाचे | अदांज पत्रकीय रक्कम | काम पुर्णत्वाचा कालावधी | अनामत रक्कम | निविदा प्रपत्रकाची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रात माझी वसुंधरा अभियानाचे अंमलबजावणीसाठी त्रयस्थ संस्थेची सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत. | रु.८,००,०००/- | कार्यादेश दिल्यापासून २०२२ चे परिक्षण होई पर्यंत | रु.८,०००/- | रु.५९० (GST सह) |

अटी व शर्ती :-
१) अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत, लखोटा क्र.०१ मध्ये सादर करण्याचा आहे.
२) याकामी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा करून दि.२५/०३/२०२२ पर्यंत दुपारी २.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत पर्यावरण विभागात उपलब्ध होतील.
३) जाहीर निविदा स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीधारक यांना राहतील.

**सही/-**
**(तृप्ती सांडभोर)**
**अतिरिक्त आयुक्त (I)**
**पनवेल महानगरपालिका**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## आमरण उपोषण सोडणार नाही पत्रकार विराज टिळक यांचा निर्धार

रविभाऊ मुंढे,तळा नगरपंचायत नगरसेवक रितेश मुंढे यांनी देखील उपोषण स्थळी भेट देऊन त्यांना पाठिंबा दिला.

विराज टिळक उपोषणाला बसल्या नंतर प्रशासनाच्या हालचाली सुरू झाल्या असून दुपारी १ च्या दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांनी उपोषणकर्ते टिळक यांची प्राथमिक चाचणी केली त्याचप्रमाणे तळा तहसीलदार यांनी या आमरण उपोषणाने कायदा आणि सुव्यवस्था यांचा प्रश्न निर्माण होऊ शकत असल्याने नगरपंचायत प्रशासनाने यावर योग्य तो तोडगा काढावा अशा सूचना केल्या आहेत.जो पर्यंत नगरपंचायत प्रशासन माझ्या मागण्या मान्य करत माहीत तोपर्यंत आमरण उपोषण सोडणार नाही यावर टिळक ठाम असून याबाबतीत नगरपंचायत प्रशासन आणि लोकप्रतिनिधी कोणता निर्णय घेतात याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

१.तळा तालुक्यात मुबलक आणि वेळेवर पाणी मिळणे २.काही कारणाने आपण मुबलक आणि वेळेवर पाणी दिले नाही तर वार्षिक पाणी कर निम्मा करणे ३. गटारावर झाकणे टाकावीत जेणेकरून अपघात टळतील.४. नाना नानी पार्क ची दुरुस्ती करण्यात यावी.५. तळा शहरात सुशोभिकरण करण्यात यावे.६. डम्पिंग ग्राउंड ची व्यवस्था करणे.७. पाण्याच्या व्हॉल्वच्या ठिकाणी बंदिस्त चेंबर करणे. ८. रस्त्यावरचे सांडपाणी गटारात जाण्यासाठी व्यवस्था करणे ९. लहान मुलांना खेळण्यासाठी बाल उद्यान तयार करणे.१०. श्री चंडिका माता मंदिर येथे जाणाऱ्या रस्त्यावर सुशोभीकरण करून सावली निर्माण करणारी झाडे तसेच वृद्धांना बसण्यासाठी बाकडयांची व्यवस्था करणे. ११. रोहा तळा चौकापासून तळा शहरापर्यंत दोन्ही बाजूला सावली देणारी झाडे लावावीत जेणेकरून तळा शहरातील पर्यावरण आणि पर्यटन वाढीस मदत होईल. या मूलभूत गरजांसाठी पत्रकार विराज टिळक उपोषणास बसले आहेत.

## ठाणा नाका येथील नागरिकांसाठी लवकरच सुरू होणार ओपन जिम

येतो सदर विकासकामांच्या वेळी त्या दृष्टीनेसुद्धा उपाय योजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले. जेणेकरून उत्सवाच्या वेळी जागेचे नियोजन व्यवस्थित होईल.

या भूखंडावर स्थानिकांसाठी गार्डन असावे यासाठी आम्ही पाठपुरावा करत आहोत त्या गार्डन संदर्भातील आराखडा बनवून तो त्वरित दाखवण्यात यावा अशी सूचना यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केली. या ठिकाणी सुरू असलेल्या पाण्याच्या टाकीचे काम पूर्णत्वास आलेले आहे जे काम बाकी आहे ते युद्धपातळीवर पूर्ण करून नागरिकांना भेडसावणारी पिण्याच्या पाण्याची तक्रार लवकर निकाली काढा असे त्याने सांगितले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## आगामी जि.प. पं. स निवडणूका भाजप स्वबळावर लढवणार, शिवसेनेशी युती नाही : आप्पा ढवळे

**दै.रायगड नगरी । माणगाव**

राज्यात आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रायगड जिल्ह्यात होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूका भारतीय जनता पक्ष स्व:बळावर लढवणार असून मात्र माणगांव तालुक्यात जि.प. प.स.निवडणूकीत यावेळी शिव सेनेशी भाजप पक्ष युती करणार नाही असे प्रतिपादन माणगाव तालुका भाजपचे अध्यक्ष संजय(आप्पा) ढवळे यांनी प्रतिनिधी जवळ बोलताना सांगितले असून पुढे त्यांनी बोलताना सांगितले की राज्यात अस्तिवात असलेल्या महाविकास आघाडीमधील घटक पक्षांमधील अंतर्गत धुसपुस व वाद हा मागील काही महिन्यांपासून रायगड जिल्ह्यात देखील दिसून येत आहे. त्याच प्रमाणे मागे झालेल्या माणगांव नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीतील एका हिंदुत्ववादी घटक पक्षाने रायगड जिल्ह्यामध्ये काही नगरपंचायतीमध्ये सोयीप्रमाणे सोयरीक साधण्याचा प्रयत्न केला व त्याचे परिणाम निकालावर व निकाल लागल्यानंतर दिसून येत आहेत. तसेच भारतीय जनता पक्ष हा देशाच्या राजकारणातील एक राष्ट्रीय पक्ष आहे.आणि देशातील जनतेने देखील भारतीय जनता पार्टीला परत एकदा स्वीकारले असून ५- राज्यातील निवडणुकांमध्ये देखील भारतीय जनता पक्षाच्या बाजूने कौल दिला आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यात आगामी होणाऱ्या निवडणूकांमध्ये भारतीय जनता पक्ष हा स्वबळावर निवडणूक लढवणार हे आता पक्के झाले आहे.

## रोहा न्यायालयातील राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये दहा खटले निकाली

**दै.रायगड नगरी । नागोठणे**


रोहा येथील कनिष्ठ स्तर दिवाणी व फौजदारी न्यायालयातील राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ठेवण्यात आलेल्या दिवाणी व फौजदारी अशा २९६ प्रलंबित खटल्यांपैकी १० खटले तडजोडीने निकालात काढण्यात आली. यामधून १ लाख ८६ हजार, ६४९ एवढी रक्कम फिर्यादींना प्राप्त झाली. तसेच या लोक अदालतीमध्ये ठेवण्यात आलेल्या दाखलपूर्व वाद खटले म्हणजेच रोहा नगरपरिषद, तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या थकीत मालमत्ता कर व पाणीपट्टी, राष्ट्रीयकृत बँका, पतसंस्था, बीएसएनएल, एमएसईबी यांच्याकडील एकत्रित ४,६१६ प्रकरणे तडजोडीकरिता लोकन्यायालयात ठेवून ती तडजोडीने मिटविण्याचे आवाहन पक्षकारांना करण्यात आले होते. त्यास पक्षकारांनी चांगला प्रतिसाद दिल्याने ८१४ प्रकरणे तडजोडीने निकाली काढून त्यामधून ७४ लाख, ५० हजार, ९०५ रक्कमेची वसुली झाली. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई., जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अलिबाग-रायगड यांच्या निर्देशानुसार रोहा तालुका विधी सेवा समिती मार्फत राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन रोहा येथील कनिष्ठ स्तर दिवाणी व फौजदारी न्यायालयात शनिवार दि. १२ मार्चला करण्यात आले होते. या लोकअदालतीचे उद्घाटन रोहा न्यायालयाचे न्यायाधीश एस.डी. कमलाकर साहेब व रोहा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अनिकेत पाटील यांच्या हस्ते डॉ. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले.

## स्वत:ची किडनी देऊन वाचवले मुलाचे प्राण ; बेबीताई चंद्रकांत लोखंडे यांच्या मातृत्वाचे कौतुक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी हे वाक्य अतिशय सार्थक आणि मार्मिक आहे. कारण तीच आपल्या मुला-मुलींना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपून त्यांचे संगोपन करते. त्यांच्यावर संस्कार करून त्यांच्या हिताचाविचार करते. शेवटच्या श्वासापर्यंत जन्मदाती आपल्या मुलाबाळांचा विचार करते. नवीन पनवेल मध्ये एका आईने तर आपल्या मुलाला किडनी दान करून त्याला एक प्रकारे दुसरा जन्म दिला आहे.

आई आपल्याला जन्म देते. आपल्या उदरामध्ये नऊ महिने ओझे वागवते. त्यानंतर लहानचे मोठे करून त्यांना त्यांच्या पायावर उभं करण्यासाठी स्वत: झिजते. ती कायम आपल्या मुलाबाळांचा विचार करत असते. अनेकदा स्वतःच्या इच्छा ती मारते. स्वत: एक वेळ जेवणार नाही पण आपल्या मुलांना ती जेवू घालणार म्हणजे घालण-ारच. इतके प्रेम ,माया त्या माऊलीच्या हृदयामध्ये आपल्या पोटच्या गोळ्याला बद्दल ठासून भरलेली असते. त्यांच्यासाठी आई आयुष्यभर खस्ता खाते;ती माय माऊली आपल्या कुटुंबासाठी राब राब राबते. परिश्रम मेहनत घेते आपण जन्म दिलेल्या मुला-



मुलींना मोठे करते. आपल्यावरीलजबाबदारी शेवटच्या श्वासापर्यंत सोडत नाही. अशाच प्रकारे नवीन पनवेल या ठिकाणी राहणाऱ्या बेबीताई चंद्रकांत लोखंडे यांनी आपल्या अभियंता असलेल्या मुलाला किडनी दान केली. शशिकांत असे त्या नशीबवान मुलाचे नाव आहे. ज्या आईने त्याला लहानचे मोठे केले.शिक्षण घेऊ त्याला इंजिनिअर बनवले. पुढे चांगल्या ठिकाणी त्याला नोकरी सुद्धा लागली. करिअर सुरळीत झाल्यानंतर लग्नसुद्धा करून त्यांच्या सुखी संसाराची साक्षीदार सुद्धा त्या बनल्या.

सर्व काही सुरळीत सुरू होते आणि आयुष्यात आनंद होता. मात्र नियतीला ते मान्य झाले नसावे; शशिकांतवर मूत्रपिंडाच्या आजाराचा आघात झाला. त्याच्या किडनी निकामी झाल्याने मोठे संकट लोखंडे कुटुंबियांवर ओढवले गेले. मात्र बेबीताई यांनी हार न मानता आपल्या मुलाला आधार व धीर दिला. इतकेच नाही तर त्याला आपली किडनी दान देऊन जीव वाचवला. यावरून आईचं हृदय हे किती विशाल आहे. त्याचबरोबर तिच्यामध्ये त्यागाची भावना हिमालय पेक्षाही मोठी आहे. याचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही.


### सुनेने मानले सासूचे आभार

शशिकांत लोखंडे यांची किडनी निकामी झाली असताना त्यांच्या आईने म्हणजेच बेबीताई चंद्रकांत लोखंडे यांनी त्यांना स्वतःची किडनी दान केली. केदार भगत मित्र परिवाराकडून त्यांचा जाहीर सन्मान केला. यावेळी त्यांच्या सून स्नेहा शशिकांत लोखंडे यांना कार्यक्रमाला आमंत्रित करण्यात आले होते. यानिमित्ताने स्नेहा लोखंडे यांनी आपल्या सासूचे जाहीर आभार मानले. त्या यावेळी म्हणाल्या की , सासूनी मला माझं फक्त सौभाग्यच नाही तर तर सर्वस्वच परत दिले असल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली.

## कशेडी घाटामध्ये बर्निंग कार; गुजरात राज्यातील कार पेटली

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील कशेडी घाटाच्या दुसऱ्या बाजूला रत्नागिरी जिल्ह्यातील उतारावर गुजरात राज्यातील एक कुटुंब असलेली कार सकाळी उन्हाचा तडाखा वाढला असताना जळून खाक झाली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.



मंगळवार दिनांक १५ मार्च २०२२ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास कशेडी टॅपच्या हद्दीत सरस्वती मंदिराजवळ रेनॉ डस्टर कार (जीजे०५जेएफ००२२) कशेडी घाटातून घेऊन जाणारे चालक विजय अनंत कदम (वय४३, रा. अमरोली, सुरत गुजरात) हे आपली पत्नी मीना कदम व मुलगा विव्हान कदम असे मुंबई ते टेरव चिपळूण असा प्रवास करीत असताना डस्टर कारने अचानक पेट घेतल्यामुळे संपुर्ण कार जळून खाक झाली.

या घटनेत कोणत्याही प्रकारची जिवीतहानी झाली नसून कारमधील सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. फायर ब्रिगेड खेड नगरपालिकेच्यामदतीने कारला लागलेली आग विझवण्यात आली. वाहतूक सुरळीत चालू ठेऊन इतर प्रवाशांनी कारमधील प्रवाशांना बाहेर काढून सुखरूप ठेवले. यावेळी कशेडी टॅप उपनिरीक्षक चांदणे, एएसआय बोडकर, पोलीस हवालदार धोपावकर, पोलीस नाईक दुगावले, चिकणे व खेड पोलीस स्टेशन पोलीस हवालदार मोरे यांनी तातडीने मदत केली.

## खालापूर येथे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे प्रशिक्षण संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल कमांडंट अनुपम श्रीवास्तव यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत उपविभागीय स्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम खालापूर येथे आयोजित करण्यात आला होता. आपत्ती व्यवस्थापन व जनजागृती कार्यक्रम प्रसंगी राष्ट्रीय आपत्ती प्रतिदास दल पुणे यांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी यावेळी उपस्थित राहून प्रात्यक्षिक दाखवीत प्रशिक्षण दिले. तसेच तहसिलदार आयुब तांबोळी, पोलीस निरीक्षक अनिल विभूते, एनडीआरएफ सब इन्स्पेक्टर एस.पी.थोरात, यांच्यासह या प्रशिक्षणासाठी सर्व शासकीय विभागाचे अधिकारी कर्मचारी, स्वयंसेवी संस्था, नागरी संरक्षण व गृहरक्षक दलाचे स्वयंसेवक उपस्थित होते.


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते आहे की, मौजे : खानावळे, ता.पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत आमचे अशिलांनी जमीन मालक श्री.रमेश राघो ठोंबरे, श्री.संजय राघो ठोंबरे, रंजना काळुराम पाटील, भारती भानुदास शेलार, रंजना ज्ञानेश्वर पाटील सर्व रा.खानावळे, ता.पनवेल, जिल्हा : रायगड यांचेकडून कायमची खरेदी करण्याची ठरविली आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**

| वर्णन | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| मौजे : खानावळे ता.पनवेल, जि.रायगड | १०९ | १ | ००.७४.१० पो.ख. ००.०१.३० | ०७.६३ |

सदरहू मिळकतीमध्ये ००.१०.५ हे.आर. क्षेत्रामध्ये कॅप्टन अवतेजिंदर सिंग मान व युराज बहल यांचा जाणे-येण्याचा रस्त्याचा हक्क आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही इतर कसलेही हक्क, हितसंबंध, दान, गहाण, बक्षिस, तारण, पोटगी, क्लेम, साठेकरार, तारण, भाडेकरूपणा, अखत्यारपत्र, एम.ओ.यु., फरोक्त अथवा इतर कसलेही क्लेम असल्यास सदरचे क्लेम/हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाले दिवसापासून १५ दिवसांच्या आत खालील सही करणारे यांचेकडे प्रथमदर्शनी दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१६/०३/२०२२

**सही/-**
**ॲड.रमेश स.महाडिक**
**म्युनिसिपल शॉपिंग कॉम्प्लेक्स,**
**गाळा नं.१९, शिवाजी चौक, मार्केट रोड,**
**जुने पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**भ्रमणध्वनी : ९७३०४२५१५९**

---

मा.पांडे सो

ॲड.रुपेश राम म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो यांचे कोर्टात

क्रिमिनल एम.ए.नं.३३९/२०२२
नि.नं.७
ने.ता.१८/०४/२०२२

संजय चंदर मोकल — अर्जदार

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रामपंचायत गव्हाण
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्याअर्थी कै.बामा नारायण मोकल यांचा मृत्यू दि.२१/०२/१९९२ रोजी किंवा त्या सुमारास मौजे : कोपर, पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे. म्हणून अर्जदार यांनी या न्यायालयात सदर कै.बामा नारायण मोकल यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकामी पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केला आहे.

सदर कै.बामा नारायण मोकल हे वर नमूद ठिकाणी मयत झाले आहेत किंवा कसे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने मा.न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात. या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखविल्या नाहीत तर न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१५/०३/२०२२ रोजी दिली.

**सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**

---

मा.सोनावणे साहेब

ॲड.शशिकांत काळू म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.३७४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२०/०४/२०२२

१) मुनिरा सलीम शेख
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) तौसिक सलीम शेख
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
३) तोहिद सलीम शेख
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
रा.एलआयजी/२, रुम नं.बी ४६, कळंबोली पोलीस स्टेशन जवळ, से.२ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड
४) सायरा उस्मान शेख
वय : ८५ वर्षे, धंदा : गृहिणी
मु.पो.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ३ यांचे वडील व अर्जदार नं.४ यांचा मुलगा पै.सलीम उस्मान शेख हे दि.१८/०६/२०२१ रोजी मौजे : सुअस्था हॉस्पिटल, रोडपाली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहेत.

पै.सलीम उस्मान शेख यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व सामाईक मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| ओवे | १७+९९ अे | ९८ | ० | ०-३४-० ०-०२-० |
| ओवे | १७+९९ बी | १ | ५ | ०-५४-० |

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा अवॉर्ड हा पै.सलीम उस्मान शेख यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत पै.सलीम उस्मान शेख यांचे वारसदार या नात्याने पै.सलीम उस्मान शेख यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील पै.सलीम उस्मान शेख यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख १५/०३/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे सो

ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.३६५/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२५/०४/२०२२

कै.तुकाराम बाबु नाईक मयतचे वारस
१) श्रीमती.निर्मला तुकाराम नाईक
वय : ७२ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.रवींद्र तुकाराम नाईक
वय : ४९ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.राज तुकाराम नाईक
वय : ४६ वर्षे, धंदा : नोकरी
४) श्री.शरद तुकाराम नाईक
वय : ४१ वर्षे, धंदा : नोकरी
पत्ता : ए-६/१, सेक्टर १३,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
५) श्रीमती.मंदा गोरकषणात कडू
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.सोनारी, ता.पनवेल, जि.रायगड
६) श्रीमती.सुरेखा अंकुश शिवकर
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
पत्ता : फ्लॅट नं.०७, विंग-ए १, प्लॉट ०१, गट नं.२१ए/३,
साई कृपा, सुकापूर, पालीदेवद, जि.रायगड, महाराष्ट्र
७) श्रीमती.सुवर्णा राजेश पाटील
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
पत्ता : ए-१२/१०, सेक्टर-१३,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. तुकाराम बाबु नाईक यांचे दि.१२/०३/२०२० रोजी ए-०६/१, समर्थ कृपा, से.१३, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन राहत्या घरी झाले असून श्रीमती.निर्मला तुकाराम नाईक, वगैरे ह्यांनी कै.तुकाराम बाबु नाईक यांच्या स्वकष्टार्जित व वडिलोपार्जित खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मिळकत नं.१**

**ए-६/१ सेक्टर-१३,**
**नवीन पनवेल पूर्व,**
**ता.पनवेल, जि.रायगड**
**सदर सदनिकेची एकूण किंमत रु.........../-**

**मिळकत नं.२**
**मौजे : बामणडोंगरी, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| गावाचे नाव | मालमत्ता क्र. | क्षेत्रफळ चौ.फु./चौ.मी. |
|---|---|---|
| बामणडोंगरी | ६०२ अ | ३०-११ / ३३० क्षेत्रफळ |

**मिळकत नं.३**
**मौजे : वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| गावाचे नाव | भूमापन क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|---|
| वहाळ | २९३/३ २९४/३ ३७९/५ | ०.०४.० ०.१०.० ०.३७.१ | ७ | ४२ डी | ८१० |
| एकूण क्षेत्रापैकी कै.तुकाराम बाबू नाईक यांच्या १/२ क्षेत्राकरिता | | | | | |

वरील मिळकत ही कै.तुकाराम बाबु नाईक यांच्या स्वकष्टार्जित व वडिलोपार्जित मालकीची आहे. श्रीमती.निर्मला तुकाराम नाईक, वगैरे हे कै. तुकाराम बाबु नाईक यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.निर्मला तुकाराम नाईक, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.तुकाराम बाबु नाईक यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१५/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गोडसे साहेब

ॲड.अनिल सुभाष जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.३६१/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२०/०४/२०२२

१) श्रीमती.गंगाबाई कचेर पाटील
वय : ७० वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्रीमती.लक्ष्मीबाई कचेर पाटील
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
३) श्री.दिपक कचेर पाटील
वय : ४२ वर्षे, धंदा : नोकरी
४) श्री.प्रदीप कचेर पाटील
वय : ४० वर्षे, धंदा : नोकरी
५) श्री.संदीप कचेर पाटील
वय : ३८ वर्षे, धंदा : नोकरी
६) श्री.प्रमोद कचेर पाटील
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी
७) श्री.प्रवीण कचेर पाटील
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.कोपरा गाव/खारघर, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१० — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ व २ चे पती अर्जदार क्रं.३ ते ७ यांचे वडील कै.कचेर गोविंद पाटील हे दि.०९/०५/२०२१ रोजी नेहा रेसिडेन्सी प्लॉट नं.११०, सेक्टर १०, खारघर कोपरा येथे मयत झाले आहेत. तसेच त्यांची तळोजा, खारघर, कामोठे, धामणी, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाची खुद्द मालकीची, नावे असलेली मिळकती आहेत त्यांचे खालीलप्रमाणे वर्णन :-

मिळकत क्रं.१
मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
सिद्धी अपार्टमेंट, सेक्टर-९, प्लॉट नं.४२, कामोठे नवी मुंबई

| मौजे | फ्लॅट नं. | क्षेत्र | मजला | विंग |
|---|---|---|---|---|
| कामोठे | १०१ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | पहिला मजला | ए |
| कामोठे | १०३ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | पहिला मजला | ए |
| कामोठे | १०४ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | पहिला मजला | ए |
| कामोठे | २०१ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | दुसरा मजला | ए |
| कामोठे | २०३ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | दुसरा मजला | ए |
| कामोठे | २०५ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | दुसरा मजला | ए |
| कामोठे | ३०१ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | तिसरा मजला | ए |
| कामोठे | ३०३ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | तिसरा मजला | ए |
| कामोठे | ३०४ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | तिसरा मजला | ए |
| कामोठे | ३०५ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | तिसरा मजला | ए |
| कामोठे | ४०२ | ४२ चौ.मी. बिल्टअप | चौथा मजला | ए |
| कामोठे | ४०३ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | चौथा मजला | ए |
| कामोठे | ४०४ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | चौथा मजला | ए |
| कामोठे | ४०५ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | चौथा मजला | ए |

मिळकत क्रं.२
मौजे : खारघर, तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड येथील शेतजमीन मिळकती

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|---|---|
| खारघर | ६७ | ४९ | ६ | ०-१६-० |
| खारघर | ६७ | ४९ | ८ | ०-६९-० |
| खारघर | ७५ ए | २०१ | ४+५ | ०-२४-५ |
| खारघर | ७५ ए | २०१ | २ बी | ०-३७-८ |
| खारघर | ७५ ए | २०१ | १ | ०-२३-० |
| खारघर | ७५ | १२ | १ | ०-५८-० |
| खारघर | ७५ | १४ | ५ | ०-२६-४ |
| खारघर | ७५ | ८६ | २+४ ए | ०-०७-८ |
| खारघर | ७५ | ९२ | २ | ०-४०-० |
| खारघर | ७५ | ९३ | १ | ०-६८-० |
| खारघर | ७५ | ११८ | ६ | ०-०५-८ |
| खारघर | ७५ | १२५ | ५ | ०-०९-८ |
| खारघर | ७५ | १२८ | २ | ०-३७-०३ |
| खारघर | ७५ | १३५ | ३ | ०-१५-० |
| खारघर | ७५ | १३५ | ६ | ०-०९-१ |
| खारघर | ७५ | १५० | १ | ०-३३-०८ |
| खारघर | ७५ | १५१ | २ | ०-०३-५ |
| तळोजा | ७५ | ८४ | १ | ०-३५-६ |
| तळोजा | ७५ | ९१ | २ | ०-६२-९ |
| तळोजा | २९१ | ३०७ | ८ | ०-१६-९ |
| तळोजा | २९१ | ३०८ | १२ | ०-०९-६ |

मिळकत क्रं.३
सातबारा धामणी, ता.पनवेल, जि.रायगड येथील शेतजमीन मिळकती

| | | | |
|---|---|---|---|
| धामणी | ३ | १८/ई | ३-४४-८० |

मिळकत क्रं.४
मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील घर मिळकती

| अ.क्र. | घर नंबर | मौजे : गावाचे नाव |
|---|---|---|
| १ | २४१ | खारघर |
| २ | २८७ | खारघर |
| ३ | २६०/अ | खारघर |
| ४ | ५५८ | खारघर |
| ५ | ५३७/अ | खारघर |
| ६ | ५३७ | खारघर |
| ७ | ५३७/अ १ | खारघर |
| ८ | ५३७/ब १ | खारघर |

कै.कचेर गोविंद पाटील यांच्या मिळकतीबाबत फायदे घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याचे दृष्टीने योग्य व उचित आहे. सबब अर्जदार यांनी सदरचा अर्जात पॅरा नं.३ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.कचेर गोविंद पाटील यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळवून घेण्याकरिता सदरचा अर्ज वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकती ह्या कै.कचेर गोविंद पाटील यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख १५/०३/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# २० टनांच्या गाडीमुळे रेशनकार्ड धारक गहू आणि तांदळा पासून वंचित

## नवीन ठेकेदार नवीन प्रश्न... १९५ रेशनिंग दुकानात धान्य पोचले नाही

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महसूल विभाच्या पुरवठा विभागाच्या आणि धान्य पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांच्या नियजोन शून्य कारभाराचा फटका तालुक्यातील १९५ रेशनिग दुकानदार आणि लाखो कार्ड धारकांना सहन करावा लागत आहे. गेली दोन महिने रेशनिग दुकानामध्ये धान्याचा पुरवठाच झाला नसल्याने फेब्रुवारी आणि मार्च महिन्याचे धान्य कार्ड धारकांना मिळाने नाही. ठेकेदारां कडे २० टनाच्या गाड्या दुकानापर्यंत पोचत नसल्याने धान्याचा पुरवठा होत नसल्याचे कारण आता पुढे आले आहे.

पनवेल तालुक्यातील जनतेला मोफत आणि माफक दरात अन्नधान्य मिळावे या साठी १९५ रेशनिग दुकाने आहे. या १९५ रेशनिग दुकाना मार्फत कमी उत्पन्न असलेल्या रेशनकार्ड धारकांना गहू तसेच तांदूळ आणि अन्य योजने नुसार कडधान्य देखील मिळते. या अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी पनवेल तालुक्यात खाजगी ठेकेदारांची नेमणूक महसूल विभागा कडून करण्यात आली आहे. मात्र या ठेकेदार आणि पुरवठा विभागाच्या नियोजन शून्य कारभाचा फक्त दुकानदारा पासून कार्ड धारकांना बसला आहे. ठेकेदारांकडे धान्य पुरवठा करण्यासाठी २० टनाच्या गाड्या आहे. मात्र या गाड्या तालुक्यातील छोट्या रस्त्यावर जाऊ शकत नसल्याने, धान्याचा पुरवठा गेली दोन महिने अखंडित झाला आहे. रेशनिग दुकाने शहरात तसेच ग्रामीण भागात आतल्या बाजूला असल्याने या गाड्या दुकाना पर्यत पोचत नसल्याने फेब्रुवारी आणि मार्च महिन्याचा अन्नधान्य पुरवठा झाला नसल्याने अनेक कार्ड धारक अन्नधान्या पासून वंचित राहिल्याचा आरोप रेशनिग दुकान अध्यक्ष भरत पाटील यांनी केला आहे. या अखंडित अन्नधान्याचा पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी पाटील यांनी पुरवठा अधिकारी यांच्या कडे केली आहे. ठेकेदारां ला जोपासण्यासाठी गरीब जनतेला वेठीस धरू नका असा आरोप या वेळी पाटील यांनी केला आहे.

फेब्रुवारी महिन्या पासून रेशनिग दुकानात धान्याचा पुरवठा, बंद झाल्याने रेशनकार्ड धारकांना फेब्रुवारी आणि मार्च महिन्याचे गहू आणि तांदूळ मिळाले नाही, त्या मुळे कार्ड धारक आणि दुकानदरामध्ये वादा वादीची प्रसंग निर्माण झाले आहेत. त्या मुळे पहिले दुकानात धान्याचा पुरवठा सुरळीत करा अशी मागणी आज भरत पाटील यांनी पुरवठा अधिकाऱ्यांकडे केली आहे.

रेशनिक दुकानातील पुरवठ्या मध्ये भ्रष्टाचार कमी व्हावा आणि रेशनकार्ड धारकांना धान्य मिळावे या हेतूने शासनाने सुरू केलेल्या पॉझ बायोमेट्रिक मशीनमध्ये अनेक अडचणी निर्माण झाल्याने पनवेल तालुक्यातील अनेक रेशन कार्ड धारक धान्या पासून वंचीत राहिले आहे. मशीन बंद, सर्व्हर डाऊन अश्या कारणा मुळे हे धान्य कार्ड धारकांना मिळालेच नाही

कार्ड धारकांना मोफत धन्य मिळावे या साठी शासनाने दुकाना पर्यत धन्य पोचवण्याची जबाबदारी ठेकेदारांकडे दिली आहे. मात्र पनवेल तालुक्याला धान्य पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांकडे २० टनांच्या गाड्या असल्यामुळे ग्रामीण भागातील छोट्या रस्त्यावर या गाड्या जाऊ शकत नसल्याने, ठेकेदारांना २,६०० रुपये द्या आणि धान्य छोट्या गाडीतून घेऊन जावा असा जावई शोध लावल्याचा आरोप भरत पाटील आणि अनिल जाधव यांनी लावला आहे.

# संक्षिप्त...

## घटस्फोट देण्यास नकार देणाऱ्या विवाहितेला फिनेल पाजण्याचा प्रयत्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घटस्फोट देण्यास नकार देणाऱ्या विवाहितेला, पती आणि त्याच्या नातेवाईकांनी मारहाण करुन तिला जबरदस्तीने फिनेल पाजल्याचा प्रकार पनवेल तालुक्यातील हेदुटणे भागात घडला आहे. तिला उपचारार्थ एमजीएम हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर पनवेल तालुका पोलिसांनी विवाहितेच्या त्याच्या नातेवाईकांविरोधात जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन पतीला अटक केली आहे.

तक्रारदार विवाहितेचे नाव शारदा जल्ला (३५) असे असून ती पनवेल तालुक्यातील हेदुटणे गावात पती आणि दोन मुलांसह राहण्यास आहे. शारदाचा पती शिवचरण जल्ला याचा ट्रान्सपोर्ट आणि कुरियरचा व्यवसाय असून त्याचे एका महिलेसोबत अनैतिक संबंध असल्याची माहिती तिला मिळाली होती. त्यामुळे मागील महिन्याभरापासून या पती-पत्नी मध्ये वाद सुरु होते. याच कारणावरुन शिवचरण याने शारदाकडे घटस्फोट मागण्यास सुरुवात केली होती. मात्र, शारदा त्याला घटस्फोट देण्यास नकार देत होती. ८ मार्च रोजी रात्री १० च्या सुमारास शिवचरण आपल्या घरामध्ये असताना त्याचे वडील, मावशी आणि नंणद, तिचे पती असे सर्वजण त्याच्या घरी गेले होते. यावेळी त्यांनी देखील शिवचरणला घटस्फोट देण्यास शारदाला बजावले. मात्र, शारदाने नकार दिल्याने त्यांच्यामध्ये भांडण झाले. या भांडणात शिवचरण आणि त्याच्या नातेवाईकांनी शारदाला मारहाण करुन तिला पकडून ठेवले. यावेळी पती शिवचरण याने आपल्याला जबरदस्तीने फिनेल पाजल्याचे शारदाने आपल्या तक्रारीत म्हटले आहे. यानंतर शारदा बेशुध्दावस्थेत गेल्यानंतर तिच्या नातेवाईकांनी तिला एमजीएम हॉस्पीटलमध्ये दाखल केले. पनवेल तालुका पोलिसांनी शारदाचा जबाब नोंदवून तिच्या पतीसह, सासरे तसेच चुलत सासू, नणंद आणि इतरांविरोधात जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अभियानांतर्गत शहरात प्लास्टीक पिशवीविरोधात जागृती

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

नगरपंचायत पोलादपूरतर्फे मंगळवारी सकाळी पोल-ादपूर बाजारपेठेमध्ये ग्राहक दिनानिमित्त स्वच्छ सर्वेक्षण अभियानांतर्गत प्लास्टीक पिशवीविरोधात जागृती निर्माण करण्यासाठी फेरी काढण्यात आली.

यावेळी नगराध्यक्षा सोनल गायकवाड, उपनगराध्यक्ष नागेश पवार यांच्यासह महिला बालकल्याण सभापती अस्मिता पवार, माजी नगराध्यक्षा सुनिता पार्टे, सत्ताधारी नगरसेवक विनायक दिक्षित, स्नेहा मेहता, मुख्याधिकारी महादेव रोडगे, संजय कांबळे तसेच स्वच्छता कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलादपूर नगरपंचायतीच्या महिला व बालकल्याण सभापती अस्मिता पवार यांनी महिला बचतगटांच्या साह्याने बनविलेल्या कागदी पिशव्यांचे नागरिकांना प्लास्टीक पिशवीविरोधी जनजागृतीपर अभियानांतर्गत वाटप केले.

## नगरपालिका, नगरपंचायत व संवर्ग कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत बेमुदत काम बंद आंदोलनाचा इशारा

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र राज्यातील नगरपालिका, नगरपंचायत व संवर्ग कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धवजी , नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे , प्रधान सचिव महेश पाठक, आयुक्त तथा संचालक डॉ. किरण कुलकर्णी यांना महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत व संवर्ग कर्मचारी संघर्ष समिती यांच्या वतीने लेखी निवेदन देण्यात आले आहे.यापूर्वी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तसेच प्रधान सचिव यांचे सोबत झालेल्या बैठकीत मांडलेल्या निवेदनातील अनेक मुद्द्यांवर शासनाकडून समस्या सोडविण्याचे वेळोवेळी आश्विसीत केले होते.

त्याची पूर्तता न झाल्यामुळे संघर्ष समितीच्या वतीने सदरचे निवेदन देण्यात आले.

यातील समस्या सोडविल्या नाहीत तर येत्या दि. २ मे २०२२ पासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येईल . सदरहू निवेदनात नमूद केलेल्या मागण्या मासिक वेतन वेळेवर मिळावे, नव्याने परंतू पाच वर्षांपूर्वी गठीत झालेल्या नगरपंचायती मंदिर पुर्वाश्रमिच्या ग्रामपंचायतीमधील कायम कर्मचाऱ्यांना विनाअट अधिक वेळ नदौडता तातडीने सामान सामान घेणे. सफाई कामगार हा सफाई कामगार आहे.

स्वतःचा जीव धोक्यात घालून इतरांना आरोग्यदायी जीवन देणारा कर्मचारी त्याची कोणतीही जात नाही. तर सफाई कामगार हि एकच जात समजून वारसांना नोकरीचे मार्ग मोकळे करणे. सन २००५ पासून प्रलंबीत आकृती बंध तात्काळ तयार करणे बाबत आदेश निर्गमित करणे. ७ व्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम देणे. अश्वासित प्रगती योजने बाबत नगरविकास विभागाने शासन निर्णय पारीत करणे. कंत्राटी कामगारांना समान कामाला समान वेतन देणे आवश्यक आहे.

सध्या ते नाही तर निदान किमान वेतन तरी मिळालाच पाहिजे. २००४ नंतर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जूनी पेन्शन योजना लागू करणे . या व अशा ३२ मागण्यांसाठीचे निवेदन देऊन जर या मागण्या मान्य नाही झाल्या तर दि. २ मे २०२२ पासून बेमुदत बंद पुकारला जाईल असा इशारा महाराष्ट्र राज्य नगरपरिषद नगरपंचायत कर्मचारी संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीनेच्या वतीने शासनाला दिड महीने आधी इशारा दिला आहे.

## श्रेया चंचे यांचे चित्र कॅनडास्थित हॉलिवूड एक्ट्रेस मेरिट रैना यांनी घेतले विकत

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील नेरळ येथील कुमारी श्रेया सुर्यकांत चंचे ही माटुंगा येथील आर्ट कॉलेज मध्ये चित्रकलेचे शिक्षण घेत आहे. सराव करण्याकरिता ती विविध रंगातून अनेक चित्रे काढीत असते. असेच एक चित्र काढून तिने इंस्टाग्राम अकाउंट वर लोड केले.तिचे हे चित्र कॅनडा स्थित हॉलिवूड कलाकार मेरिट रैना यांना आवडले.

तिने श्रेयाला इमेल करून चित्र विकत घेण्याची इच्छा व्यक्त केली.परंतु मी विक्रीसाठी नव्हे तर हौस म्हणून चित्र काढते. आपणाला हवे असल्यास मी चित्र तुम्हाला पाठवते, असे सांगून ते चित्र कॅनडाला पाठवले.या बदल्यात त्या महिलेने १४९ कॅनेडियन डॉलर श्रेयाच्या अकाउंट मध्ये जमा केले.

आपल्या कलेला परदेशी महिलेने प्रोत्साहन दिल्याने तिच्या कॉलेज शिक्षक आणि वर्गमित्रानी तिचे अभिनंदन केले. श्रेया चित्रकलेसोबत छान कविता सुद्धा लिहिते. तिने कोरोनावर लिहिलेले ' भारत को अब जिताना है।' हे यु ट्यूबवर आहे त्याच्या चित्रीकरणात अनेक मराठी चित्रपटातील कलाकारांनी भाग घेतला आहे. नेरळच्या या गुणी मुलीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## माथेरानमध्ये भारतीय जनता पक्षाच्या वतीने शालांत परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा !



**दै.रायगड नगरी । माथेरान**

शालेय जीवनातील शेवटची पायरी आणि उभरत्या आयुष्यात येणारे चढउतार यांचा समतोल साधण्यासाठी दहावीच्या परीक्षेचे वर्ष महत्त्वाचे असते यातूनच पुढील महाविद्यालयीन वाटचालीला विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने सुरुवात करावी लागते.मागील दोन वर्षे कोरोना मुळे ऑनलाइन परीक्षा झाल्या, त्या वेळी विद्यार्थी आणि, पालकांवर नेहमी प्रमाणे परीक्षेचे दडपण नव्हते. नुकताच कोरोनाचे संकट टळल्यामुळे दहावीच्या परीक्षा ऑनलाइन पध्दतीने घेण्यासाठी शासनाने संकेत दिले आहेत.परीक्षा केंद्रावर १५ मार्च ते ४ एप्रिल या वीस दिवसांत या परीक्षा घेण्यात येत आहेत. माथेरान मधील परीक्षा केंद्रावर सतरा विद्यार्थी आणि सतरा विद्यार्थीनी अशा एकूण ३४ विद्यार्थ्यांचा परीक्षेत समावेश आहे.

दहावीच्या अर्थातच एस. एस. सी. बोर्डाच्या परीक्षेत बसणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सकाळी नऊ वाजता श्रीराम चौकात माथेरान भारतीय जनता पक्षाच्या वतीने प्रत्येकी एक पेन,आणि पुष्प देण्यात आले.यावेळी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी तथा उत्तम प्रशासक सुरेखा भणगे शिंदे यांनी या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी आवर्जून उपस्थिती दर्शवली होती. मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी परीक्षा केंद्रावर लाईट , पाणी सॅनिटायजर , मास्क, सर्व सुविधा करून सुसज्ज केले आहे.दक्षता कमिटीचे सदस्य सुध्दा यावेळी परीक्षा केंद्रावर शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते.यावेळी श्रीराम चौकात भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष प्रवीण सकपाळ, उपाध्यक्ष किरण चौधरी,भाजपचे माजी नगरसेवक चंद्रकांत जाधव, प्रदीप घावरे,राजेश चौधरी, राकेश चौधरी,संदीप नारायण कदम,अरविंद शेलार, माजी नगरसेविका प्रतिभा घावरे, संध्या शेलार, माजी अध्यक्ष विलास पाटील,बाबू बर्गे, सुभाष भोसले, संजय भोसले,सुजय भोसले यांसह परीक्षक गजानन साळुंखे , केंद्र प्रमुख कल्पना पाटील ,उप केंद्र प्रमुख लक्ष्मण ढेबे ,शिक्षक वृंद ,सर्व माजी लोकप्रतिनिधी तसेच पालक वर्ग मोठया संख्येने शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते.

## धारदार शस्त्राने वार करून हत्येचा प्रयत्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

८० हजार रुपये दिले नाही म्हणून धारदार शस्त्राने वार करून हत्याचा प्रयत्न केल्याची घटना तळोजा येथील देवीचापाडा येथे घडली आहे. प्रशांत मुळे, आकाश खंडागळे व आदित्य साळुंखे यांच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या नगरसेविका अरुणा दाभणे यांचे पती किरण दाभणे यांनी व सहकाऱ्यांनी देवीचा पाडा येथे गावदेवी महोत्सव आयोजित केला होता.

त्यावेळी प्रशांत हनुमंत मुळे हा महोत्सव आयोजित करण्याबददल एक लाख रुपये खंडणी मागण्यासाठी आला. ११ मार्च रोजी त्याला वीस हजार रुपये देण्यात आले. उरलेल्या ८० हजार रुपयांसाठी त्याने तगादा लावला. पैसे दिले नाही तर महोत्सवात राडा करीन अशी धमकी दिली. १३ मार्च रोजी प्रशांत मुळे हा त्याचा साथीदार आकाश खंडागळे व आदित्य साळुंखे यांच्यासह आला. व सोहम दाभणे याला शिव्या दिल्या व त्यांच्यात बाचाबाची झाली.

यावेळी त्यांनी सोहमला लाथाबुक्क्यांनी मारून चाकू काढून सोहमच्या पोटात वार केले. व ते तिघेही पळून गेले. एक लाख रुपयांची खंडणी मागून उर्वरित ८० हजार रुपये दिले नाहीत म्हणून सोहम दाभणे याच्यावर धारदार शस्त्राने वार केल्या प्रकरणी तिघांवर तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.


**श्रीवर्धन नगरपरिषद, श्रीवर्धन**
**रविंद्र नारायण राऊत प्रशासकीय भवन**
**ता.श्रीवर्धन, जिल्हा : रायगड**
(I.S.O. 9001 : 2015 प्रमाणित)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी क्रमांक : ०२१४७-२२२३७८ ई-मेल : Shriwardhan.nagarparishad@gmail.com

क्र.श्रीनप/आवि/कात १०/फेरनिविदा जाहीर निविदा ०९/१६०२/२०२१-२२ दिनांक : १५/०३/२०२२

**फेर निविदा**
**(विद्युत विभाग) जाहीर निविदा सुचना क्र. /२०२१-२२**

श्रीवर्धन नगरपरिषद इच्छुक ठेकेदार / पुरवठादार यांचेकडून इच्छुक ठेकेदारांकडून खालील कामांसाठी दोन लिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मागवित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्म फी (रुपये) | इसारा रक्कम (रुपये) | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीवर्धन नगरपरिषद विद्युत विभागाकडील देखभाल दुरुस्ती कामाकरिता आवश्यक यंत्रणा पुरविणे. (फेरनिविदा) | १०००/- | ७७४८/- | १ वर्षे |

अटी व शर्ती :-

१) विहित नमुन्यातील सर्व अटी व शर्तीसह निविदा पत्रे / फॉर्मची विक्री नगरपरिषद कार्यालय, श्रीवर्धन येथे कार्यालयीन वेळेत दिनांक १६/०३/२०२२ ते २२/०३/२०२२ पर्यंत कामकाजाचे दिवशी निविदा फॉर्म फी रक्कम नगरपरिषद कार्यालयात भरणा करून निविदा पत्रे / फॉर्म प्राप्त करून घेता येतील. २) विहित निविदा पत्रके वेगवेगळ्या दोन सिलबंद लखोट्यात दिनांक १६/०३/०२२ ते २२/०३/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालयात दाखल करता येतील. ४) प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २३/०३/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत श्रीवर्धन नगरपरिषदेच्या मा.मुख्याधिकारी यांच्या दालनात उघडण्यात येईल. ५) तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करावयाची कागदपत्रे निविदा फॉर्ममध्ये नमूद करण्यात आलेली आहेत. ६) उशिरा प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. ६) इसारा रकमेचा राष्ट्रीयीकृत बँकेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) / बँकर्स चेक प्रत्येक कामाचे तांत्रिक बोलीचे लिफाफ्यामध्ये निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. (किंवा सदरची इसारा रक्कम नगरपरिषदेकडे भरणा करून त्याची पावती निविदेसोबत सादर करावी.) ८) सही नसलेली व अटी अगर शर्तीची निविदा स्वीकारली जाणार नाही. ९) निविदा सूचना व करारनामा हा निविदेचाच एक भाग असेल. १०) पुरवठा करण्यात येणारी साहित्य स्पेसिफिकेशनप्रमाणे मान्यताप्राप्त कंपन्यांचे पुरवठा करणे ठेकेदारास बंधनकारक राहील. ११) भाववाढीचे कलम कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही. १२) मंजूर झालेल्या ठेकेदारांची इसारा रक्कम ही सुरक्षा अनामत रक्कम म्हणून गृहीत धरण्यात येईल. सदर निविदेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर तीन महिन्यानंतर इसारा रक्कम परत केली जाईल. १३) निधीच्या उपलब्धतेनुसार कामाची देयके अदा करण्यात येतील. १४) कोणतीही निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारणे, नाकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचे अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवले आहेत. १५) नगरपरिषदेने ज्या ठेका कंपनींना अथवा त्यांचेशी संबंधित व्यक्तींना निविदा न देण्याचा निर्णय घेतला आहे, अशा ठेका कंपनींना व त्यांचेशी संबंधित व्यक्तींना नगरपरिषदेकडे प्राप्त निविदांमध्ये कोणत्याही ठेकेदाराचे प्रतिनिधीत्व करता येणार नाही.

**सही/-**
**(विराज आत्माराम लबडे)**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**श्रीवर्धन नगरपरिषद**


## हिंद मराठा महासंघ कोकण प्रदेश अध्यक्षपदी निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त विनोद चव्हाण यांची निवड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हिंद मराठा महासंघ राष्ट्रीय संस्थापक सदानंदराव भोसले राष्ट्रीय अध्यक्ष उज्वलसिंह राजे गायकवाड राष्ट्रीय सरचिटणीस ॲड. किशोर बांदल देशमुख यांच्या सुचनेनुसार राष्ट्रीय सचिव शिवाजीराव पालांडे यांनी निवृत्त एसीपी विनोदराव बाबुराव चव्हाण यांची निवड जाहीर केली.



या वेळी बोलताना राष्ट्रीय संस्थापक सदानंदराव भोसले यांनी सांगितले गेली अनेक वर्षे त्यांनी कोकण प्रदेश येथे सेवा काल पूर्ण केला त्यांच्या सुस्वभावी गुणामुळे त्यांनी अनेकांना आपले से केले समाज बांधव मोठ्या प्रमाणात आपला माणूस म्हणुन अधिकारवाणीने संपर्क साधून अनेक वर्ष सामाजिक क्षेत्रात मार्गदर्शन केले. समाजाची सेवा करत असताना संपूर्ण कोकणला आपलेसे वाटू लागले.

निवृत्ती नंतरचे आपले आयुष्य समाज ऋणातून उतराई होण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करीत समाजहित डोळ्यासमोर ठेवूनच हिंद मराठा महासंघ ध्येय धोरणानुसार काम करावयाचे आहे असे प्रतिपादन त्यांनी बोलताना स्पष्ट केले.

त्यांच्या निवडीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे लाखो समाज बांधव देशभरातून सदिच्छा शुभेच्छा व्यक्त करत अभिनंदन करत आहेत. पनवेल येथे होळी नंतर त्यांचा पदग्रहण सोहळा आयोजित करण्यात येणार असल्याचे सूत-ोवाच या वेळी बोलताना भोसले यांनी सांगितले. राष्ट्रीय अध्यक्ष उज्वलसिंह राजे गायकवाड, राष्ट्रीय उपाध्यक्ष गणेश शेडगे, राष्ट्रिय सल्लागार हेमंत बाबुराव शिंदे, राष्ट्रीय सल्लागार किशोर केसरकर, रोजगार उद्योग विभाग राष्ट्रीय अध्यक्ष संजय पवार, कार्याध्यक्ष राजेंद्र आंब्रे, राज्य कार्याध्यक्ष सुधीर पालांडे, राज्य उपाध्यक्ष महेश पालांडे, कोकण प्रदेश सरचिटणीस प्रवक्ते संजय रेवने, गुजरात राज्य अध्यक्ष देवेश माने, बडोदे जिल्हा अध्यक्ष प्रदीप मोरे, सुरत जिल्हा अध्यक्ष संतोष मालुसरे, शहर अध्यक्ष राजु शेवाळे, बळसाड जिल्हा अध्यक्ष योगेश भोसले, वापी शहर अध्यक्ष अमेय पालांडे, बैतूल जिल्हा अध्यक्ष योगेश्वर राव गायकवाड, इंदोरचे नेते मल्हारराव कदम, हिमाचल प्रदेश अध्यक्ष चंद्रकांत वाघ, कर्नाटक प्रदेश अध्यक्ष ज्ञानेश्वर खाडे, हरियाणा राज्य अध्यक्ष राम नारायण, मराठा पालघर जिल्हा अध्यक्ष संतोष सावंत, रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष सतीश मोरे, पुणे जिल्हा अध्यक्ष कृष्णा साळवी, चित्रपट रंगभूमी विभाग राष्ट्रीय अध्यक्ष शिमगा चित्रपटाचे निर्माता दिग्दर्शक निलेश पालांडे, हिंद मराठा महासंघ महीला अध्यक्षा सौ ज्योती लक्ष्मणराव भोसले, राज्यसरचिटणीस वप्रवक्ते श्रीकांत चाळके, मुंबई प्रदेश महीला अध्यक्षा भक्ती भार्गव भोसले, रत्नागिरी उतर जिल्हा अध्यक्षा सौ सायली संतोष भोसले, जिल्हा उप अध्यक्ष विजय येरुंकर सर, चिटणीस जयवंत पालांडे डॉक्टर शिवदास भोसले खेड, तालुका प्रमुख राजेंद्र घाग, ॲड आनंदराव भोसले, पुणे जिल्हा अध्यक्ष कृष्णा साळवी वसई विरार महानगर पालिका अध्यक्ष जितेन्द्र पालांडे पुणे जिल्हा महिला अध्यक्षा श्रीमती सुनिता दत्ताराम चव्हाण रत्नागिरी दक्षिण जिल्हा कार्याध्यक्ष विनायक खानविलकर महीला अध्यक्षा सौ अमृता अरविंद नलावडे रत्नागिरी जिल्हा संघटक अशोक पालांडे आदी मान्यवरांसह सह देशभरातून मराठा बांधव अभिनंदनाचा वर्षाव करत आहेत.